www.maharashtratimes.com
मटा +TOI : पुण्यात नंबर १
महाराष्ट्र टाइम्स

# दिव्यांगांसह कार्यक्रम

सिटी इंटरनॅशनल स्कूलच्या सहावीच्या विद्यार्थ्यांनी वानवडी येथील अपंग कल्याणकारी शिक्षण संस्था आणि संशोधन केंद्राला भेट दिली. या विद्यार्थ्यांनी दिव्यांग मुलांसोबत बालदिन साजरा केला. संस्थेच्या ग्रंथालयाला पुस्तके भेट देण्यात आली. शिशूगटातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेला पपेट शो आणि मोठ्या मुलांसाठी दाखविण्यात आलेल्या चित्रपटाचा आस्वादही विद्यार्थ्यांनी घेतला. प्राचार्य अर्चना क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.